संचालक, सी.बी.आय.

वि.

नियमावेदी तर्फे सदस्या, ॲड. के.नंदीनी, व इतर

५ एप्रिल, १९९५

मा. सर न्यायाधीश ए.एम. अहमदी आणि मा. न्यायमूर्ती सुजाता व्ही.मनोहर

फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३- कलमे १६२ आणि १७२ तपासात न्यायालयास हस्तक्षेप करण्याचा अधिकार - तपास अपुरा असताना न्यायालयाने त्यापासून परावृत्त होणे आवश्यक आहे.

तपासा दरम्यान पोलीसांना दिलेले जबाब - पोलीस दैनंदिनी - वापरण्याची मर्यादा - परवानगी बाबत - असे धरण्यात आले आहे की, न्यायालयाने आपल्या आदेशात पोलीस दैनंदिनीमध्ये आणि तपास टिपणात असलेला मजकुर उघड करण्यापासून परावृत्त व्हावेच.

तपासाच्या पध्दतीबाबत उच्च न्यायालयाने केलेले भाष्य असे धरण्यात आले की, तसे करण्यापासून न्यायालयाने टाळले पाहिजे.

'आय.एस.आर.ओ.' (इस्त्रो) हेरगिरी प्रकरणाचा तपास चालू असताना, एका संघटनेने केरळ उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करुन यात अशी प्रार्थना केली की, उत्तरवादी क्रं.१ इन्स्पेक्टर जनरल आफ पोलीस दक्षिण विभाग याचा प्रकरणातील सहभाग विचारात घेता त्याला अटक करावी आणि त्याला सेवेतून निलंबी करण्यात यावे. उच्च न्यायालयाने सदरची याचिका

फेटाळली तसेच त्यावर केलेले अपिल खंडपिठाने देखील फेटाळले. तथापि, उत्तरवादी क्रं.१ याचा गुन्हयातील सहभागाबाबत असलेल्या कथनाची छानणी करताना खंडपिठाने आपल्या निकाल पत्रात पोलीस दैनंदिनीतील माहीती आणि तपास कामी नोंदवण्यात आलेले जाबजबाब उघड केले. खंडपिठाने सी.बी.आय. करत असलेल्या तपासाच्या पध्दतीवर देखील भाष्य केले. खंडपिठाच्या या आदेशाविरुध्द विशेष अनुमती याचिका या न्यायालयात दाखल करण्यात आली.

याचिका निकाली काढताना या न्यायालयाने असे धरले की,

१ फौ.प्र.सं. १९७३ नुसार, कलम १६२ आणि १७२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे पोलीसांसमोर दिलेला जबाब आणि पोलीसांची दैनंदिनी अगदी खटल्याच्या सुनावणीच्या वेळी देखील मर्यादितच वापर करावा. त्या दैनंदिन्या आणि जबाब यातून मिळालेली माहीती विशेषत तपास प्रगती पथावर असताना खंडपिठाने उघड करावयास नको होते. तसेच, सी.बी.आय. च्या तपास करण्याच्या पध्दतीवर भाष्य करावयास करायला नको होते.

२ तपासकामी हस्तक्षेप करण्याची प्रवृत्ती वाढ चालली असून त्याच्या संभाव्य दुष्परिणापासून सावध रहावयास हवे. तपासात हस्तक्षेप होईल या प्रकारची निरीक्षणे करु नयेत. सर्व साधारणपणे तपास अपरिपक्क अवस्थेत असताना तपास करण्या-याचे मनोधर्य खचेल आणि तपासाचे काम रुळावरुन घसरेल. अश्या स्वरुपाचा हस्तक्षेप न्यायालयाने तपासात करु नये.

३ ' सी.बी.आय.' च्या संचालकांना (खंडपिठाने) दिलेल्या ज्या निर्देशास आमची मान्यता नाही. त्यांकडे दुर्लक्ष करण्यास हरकत नाही. थोडक्यात 'सी.बी.आय'. विरुध्द प्रतिकुल टिपण्या या अपरिपक्क आणि अनावश्यक असून, टाळता येण्यासारख्या होत्या. तथापि, न्यायालयाने तपासी यंत्रणेने कार्यक्षमतेने आणि दक्षतेने कोणाच्याही दबावाखाली न येता आपले काम करावे हे न्यायालयाने व्यक्त केलेले मत तसेच अपिल फेटाळण्याचा निर्णय बरोबरच आहे.

केरळ उच्च न्यायालयाच्या फौजदारी रिट अर्ज क्रं. १६७६/१९९४ मधील ता. १३.०१.१९९५ च्या निकाल आणि आदेशाविरुध्द

डी.पी. गुप्ता, सॉलीसिटर जनरल, के.टी.एस. तुळशी, ॲडीशनल सॉलीसिटर जनरल के. परासरन, के. स्वामी आणि पी. परमेश्वरन पिटीशनर्स तर्फे

ए. एक्स. व्हर्गीस आणि एम.के.डी. नंबूद्री उत्तरवादींतर्फे

न्यायालयीन निकाल मा. न्यायमुर्ती सौ. सुजाता व्ही. मनोहर यांनी जाहीर केला.

केरळ राज्यातील थिरुअनंतपुरम जिल्हयातील, वंचियुर पोलीस ठाण्यातील गुन्हे क्रं.२२५/१९९४ आणि २४६/१९९४ या 'आय.एस.आर.ओ.' (इस्त्रो) हेरगिरी प्रकरणाचा तपास सुरुवातीला राज्य पोलीसांनी केला. ता.०३.१२.१९९४ ला, केरळ राज्य शासनाच्या विनंतीवरुन सदरचा तपास भारत सरकारने सेन्ट्रल ब्युरो ऑफ इनव्हेस्टीगेशन कडे सोपवला. त्यानुसार सी.बी.आय. च्या एस.आय.सी. II शाखेत नोंदवण्यात आले. आर.सी.१० (एस.) ९४ आणि ११ (एस) ९४ हे गुन्हे नोंदवण्यात आले. आर.सी.१० (एस.) ९४ चा तपास पूर्ण झाल्यानंतर केरळ राज्यातील अर्नाकुलम येथील मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्याकडे ता. ०७.१२.१९९४ ला, दोषारोपपत्र दाखल झाले. आर.सी.११ (एस.) ९४ चा तपास पुढे चालू राहिला.

ता.०३.१२.१९९४ ला, 'सी.बी.आय.'कडे तपास सोपवल्यावर तो प्रगती पथावर असताना, 'नियमावेदी' संघटनेने ता.१३.१२.१९९४ ला, केरळ उच्च न्यायालयात ओ.पी. क्रं. १७३६७/१९९४ ही जनहित याचिका दाखल करुन त्यात अशी प्रार्थना केली की, उत्तरवादी क्रं.१ रमण श्रीवास्तव, 'आय.पी.एस'. 'इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस' दक्षिण विभाग, केरळ राज्य, त्रिवेंद्रम याचा प्रकरणात सहभाग असल्याने, संचालक 'सी.बी.आय'. नवीदिल्ली यांनी अटक करावी. तसेच

असे देखील निर्देश देण्यात यावेत की, केरळ राज्य शासनाने त्याला निलंबित करावे आणि त्याला सेवेतून काढून टाकावे. मा. उच्च न्यायालयाच्या एकमेव न्यायमूर्तींनी ती याचिका फेटाळताना असे धरले की, या टप्यात या विषयात न्यायालयीन हस्तक्षेप करण्याचा अधिकार अगदी मर्यादीत आहे. मा. न्यायमूर्तींनी असे देखील नोंदवले की, राज्य शासनाने या आशयाचे विधान केले आहे की, शासनास कोणत्याही अधिका-याचा अनावश्यक बचाव करण्यात किंवा लपवण्यात सारस्व नाही. शासनास जर 'सी.बी.आय'.चा तसा अहवाल प्राप्त झाला तरच, ते तक्रारीनुसार पुढील कारवाई करेल.

अपिलाचे कामी मा.केरळ उच्च न्यायालयाच्या खंडपिठाने सविस्तर निकाल देऊन, 'तपास चालू असताना, न्यायालयास हे अधिकार नाहीत की, तपास अधिकारी यांनी एखादयास त्या खटल्याचे कामी आरोपी म्हणून सामील करावे असे निर्देश तपास अधिका-यांना दयावेत' या कारणाने सदरचे अपिल योग्यरित्या फेटाळले आहे. संचालक, 'सी.बी.आय.', गृह-सचिव, गृह-मंत्रालय, संचालक संशोधन आणि विश्लेषण पक्ष (विंग) आणि संचालक, 'सी.बी.आय'. या कामी याचक (पिटीशनर) आहेत. केरळ उच्च न्यायालयाच्या खंडपिठाने अपिल फेटाळताना, काही निरीक्षणे नोंदवली आहेत. त्यांना आव्हान देण्यासाठी आम्हास अपिल करण्यास 'विशेष-अनुमती' दयावी. अशी त्यांची विनंती आहे.

खंडपिठाच्या निर्देशानुसार,पिटीशनर याने न्यायालयाच्या अवलोकनासाठी केरळ राज्य पोलीसांच्या प्रकरण दैनंदिनी (केस डाय-या) तसेच गुन्हयाच्या तपास कामी नोंदवलेले जबाब आणि काही व्ही.डी.ओ.कॅसेट सादर केल्या होत्या. हे सारे खंडपिठाच्या न्यायमूर्तींनी आपल्या निजीकक्षात पाहिले. तथापि, तपासकामी ही गोळा झालेल्या माहीतीचा सविस्तर उल्लेख उत्तरवादी क्रं.१ याचा गुन्हयातील कथाकथित सहभाग आहे किंवा नाही ? या प्रश्नाचा निर्णय करताना निकालपत्रात केला. फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ मध्ये हे स्पष्ट आहे की, पोलीसांसमोरील नोंदवलेले जबाब

पोलीसांच्या दैनंदिन्या यांचा वापर अगदी खटल्याच्या सुनावणीच्या वेळी देखील मर्यादित स्वरुपात करावा. फौ.प्र.सं.च्या कलम १६२ आणि १७२ मध्ये असे नमूद आहे. सबब, खंडपिठाने आपल्या आदेशात पोलीसांसमोरील जबाब आणि दैनंदिन्या याचा मजकूर घालावयास नको होता. विशेषत: खटल्याचा तपास अजून चालू होता. तसेच, तपास पुर्ण होण्यास अजून बराच अवधी असताना, त्या आधीच 'सी.बी.आय'. च्या तपास करण्याच्या पध्दतीवर खंडपिठाने भाष्य करावयास नको होते. तपासकामी हस्तक्षेप होईल या प्रकारचे कोणतेही निरीक्षण नोंदवायला नको होते. सर्वसाधारण पणे तपासाचे काम अपुरे असताना, न्यायालयाने त्यात हस्तक्षेप करण्यापासून परावृत्त व्हायला हवे कारण, तसे केल्याने तपास करणा-यांचे मनोधर्य खच्ची होऊन तपासाचे काम रुळावरुन घसरु शकते. तपासकामी हस्तक्षेप करण्याची प्रवृत्ती वाढत असून, न्यायालयाने त्याच्या संभाव्य दुष्परिणाम बाबत सावध रहायला हवे. यापेक्षा आम्हास आधीक काही सांगावयाचे नाही. तथापि, आम्ही असे स्पष्ट करतो की, 'सी.बी.आय.' च्या संचालकांना दिलेल्या ज्या निर्देशास आमची मान्यता नाही. त्यांकडे दुर्लक्ष करण्यास हरकत नाही. थोडक्यात 'सी.बी.आय'. विरुध्द प्रतिकुल टिपण्या या अपरिपक्क आणि अनावश्यक असून, टाळता येण्यासारख्या होत्या. तथापि, न्यायालयाने तपासी यंत्रणेने कार्यक्षमतेने आणि दक्षतेने कोणाच्याही दबावाखाली न येता आपले काम करावे हे न्यायालयाने व्यक्त केलेले मत तसेच अपिल फेटाळण्याचा निर्णय बरोबरच आहे.

सदरची याचिका मंजूर केल्याने कोणताही उदिष्ट साध्य होणार नसल्याने वरील निरीक्षणे नोंदवून विशेष अनुमती याचिका त्यानुसार निकाली काढली आहे.

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर

कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.